International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—6 RNI : RAJBIL/2009/30097

शोधपत्र

March, 2010

# खुलताबाद तालुक्यातील स्थापत्यशिल्पे

*उपप्राचार्य डॉ. कृष्णा मालकर

* श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगांव ( रंगारी ), औरंगाबाद

महाराष्ट्राच्या इतिहासाला प्राचीन काळापासुल एक वैभवशाली परंपरा लाभली आहे. महाराष्ट्राच्या मध्यवर्ती दुर्गम व काहीसा अविकसीत असा मराठवाड्याचा प्रदेश असला तरी इतर भागांच्या तुलनेत आपली प्रतिष्ठा इतिहासात उमटवली आहे. खुलताबाद तालुक्याचे भौगोलिक स्थान हे उत्तर आक्षांस $20^0$ 58′ अंश असुन पूर्व रेखांश $75^0$ 14′32″ अंशावर आहे. खुलताबाद तालुक्याचे क्षेत्रफळ 93 चौ. मैल इतके आहे.[1] औरंगाबादपासुन 25 कि. मी. अंतरावर खुलताबाद शहर वसलेले आहे. प्राचीन काळात हा परिसर दंडकारण्याचा भाग म्हणुन ओळखला जातो. सह्याद्री पर्वत रांगाच्या सातमाळा या उपशाखामध्ये खुलताबाद परिसर मोडतो. खुलताबाद जवळील बालघाटाच्या दोन पर्वत रांगा म्हैसमाळ व कलाकठा नावाने ओळखल्या जातात. खुलताबाद तालुक्याला प्राचीन काळापासुन धार्मिक इतिहास फार मोठ्या प्रमाणात लाभलेला आहे. जग प्रसिद्ध वेरूळ लेण्या, घृष्णेश्वर मंदीर, शिवाजी महाराजांच्या पूर्वजांची गढी, सूलीभंजन, श्री क्षेत्र गदाना, बाजार सावंगी, म्हैसमाळ, धामणगांव, वडोद. खुलताबाद मधील सुफी संतांचे दर्गाह, या धार्मीक स्थळाचा समाज जिवनावर फार मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडलेला आहे[2]

**वेरूळः**– ऐलापूर किंवा येलापूर या नावाने ऐतिहासीक काळापासून परिचित असलेल्या वेरूळची ओळख केवळ लेण्यामुळेच होते असे नाही तर लेण्या कोरण्यापूर्वी पासुनच येथे घृष्णेश्वर या शिव मंदीरामुळे हे गांव शिव भक्तांना आदराचे वाटते.

**धन्य वेळूर नगर । *ऐसे नाही धरणीवर ।।***
***नांदे जेथे घृष्णेश्वर । स्थान सर्वोत्तमाचे ।।***

श्री घृष्णेश्वराची महिमा मोठी अगाध आहे. वेरूळ, शिवालय आणि घृष्णे वर तिन्ही नावाच्या वेगवेगळ्या कथा अनेक ग्रंथात वर्णन केलेल्या आहेत. या वेरूळ क्षेत्राचे नाव एलोरा असे जगभर प्रसिद्ध झाले आहे.[3] महिमा वर्णन करतांना प्रसिद्ध संत मध्वमुनीवर महाराज आपल्या वाणीत लिहीतात –

**पाहे सु क्षेत्र । प्राण्या जाउ नको दुर।**
**व्यर्थ होसी तुं चुकूर। खोटे व्यसन कामाचे।।**

भारतीय धर्मशास्त्रानुसार सर्व ज्योतीर्लीगाची यात्रा झाल्यावर घृष्णेश्वराचे दर्शन घेतल्याशिवाय यात्रेची सफलता होत नाही असे म्हणतात. घृष्णेश्वर मंदिर हिंदुच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे तिर्थक्षेत्र आहे. घृष्णेश्वर मंदीर राष्ट्रकुट राजा पहिला कृष्ण इ. स. (756 ते 773) याने बांधले आहे.[4]

**लक्षविनायक मंदीरः**–हिंदु धर्माच्या रूढी परंपरेनुसार कोणत्याही धार्मीक कार्याच्या सुरूवातीस ते कार्य निर्वीघ्नपणे पार पाडण्यासाठी सर्व प्रथम श्री गणेशाचेच पुजन केले जाते. संपूर्ण भारतात श्री गणेशाचे एकविस श्रोतपिठे आहे. त्यापैकी सतरावे गणेशपीठ लक्षविनायक गणपती मंदीर आहे.

श्रीगणेशास अनेक नावाने संबोधतात. विघ्नेश्वर गणपती, लंबोदर, गजानन, विनायक जो लक्ष विनायक या नावाने श्री क्षेत्र वेरूळ येथे उध्दरार्थ वास करीत आहे. श्री लक्ष विनायक नामाभिधानाच्या बाबतीत अंकुश पुरानाच्या आधारे असे सांगता येते की, श्री खानदेश प्रभुचा प्रिय पुत्र जो लक्ष नायक, लक्ष भुजांना धारण करणारा असा बुद्धीचा पुत्र सृष्ट्यादिकाली याच स्थळी श्री गणराजप्रभुचे आराधना केले.

त्याच्या भक्तीबलाने प्रसन्न झालेला स्वानंद प्रभु लक्षविनायक नावाने त्यानाचे येथे स्थापीला आहे. दिव्य ज्योतिर्मय असे हे स्थान मुलभूत असे दण्डकारण्यात गुढ रूपाने प्रतिष्ठित होते.[5]

**हरीहरात्मक रूख्मिणी–पांडूरंग मंदीरः**–संत ज्ञानेश्वराच्या समकालीन एक महान संत श्री मत्परमहंस मल्हार स्वामी होऊन गेले होते. शिव व विष्णुचे पांडुरंग रूप असलेली मुर्ती हरीहरात्मक रूख्मिणी या मंदीरात दिसुन येते. 124 वर्ष मल्हार स्वामींनी गायीत्री मंत्राचे अनुष्ठान केले व त्यांना साक्षात्कार झाला. गावातील एक शेतकरी शेत नागरत असतांना त्यांच्या नांगरांचा फाळ लागून रक्ताची चिळकांडी जमीनी बाहेर उडाली. हे दृष्य पाहून शेतकरी घाबरला व स्वामीजीकडे धावत आला व स्वामीजीला हा प्रकार सांगीतला तेव्हा स्वामीजी म्हणाले, अरे तो माझा विठोबाच असेल चला आपण त्याची स्थापना करू. त्या ठिकाणी पोहोचल्यावर त्यांनी जमीन उकरताच त्यांना एक दैदिप्यमान मुर्ती सापडली. त्यांनी ती मुर्ती आपल्या तपोधामाजवळ स्थापन केली. ती मुर्ती म्हणजे शिल्प कलेचा अद्वितीय नमुना होय.

हि मुर्ती म्हणजे शिव व विष्णुचे पांडूरंग रूप आहे.[6] आज हे मंदीर भक्तांनी गजबजलेले असते. मंदिरात स्वामीजींच्या काळापासुन गोपाळ काला हा उत्सव सुरू आहे तो आज ही सुरूच आहे. या

कार्यक्रमास दर वर्षी मोठी यात्रा भरते.

**खुलताबादचा भद्रा मारूती** :—असंख्य भक्ताच्या श्रद्धेचे व भक्तीचे जागृत देवस्थान म्हणजेच खुलताबाद येथील भद्रा मारोतीचे निद्रीत अवस्थेत हनुमान आपणास कोठे ही दिसणार नाही. संपूर्ण भारतात अलाहाबाद आणि खुलताबाद या दोनच ठिकाणी निद्रीस्त हनुमानाची मंदीर आहेत. लाखो भाविकांचे मनोकामना पूर्ण करणारे, भक्ताच्या नवसाला पावणारे अत्यंत जाज्वल देवस्थान भद्रा मारोतीचे गाव म्हणून खुलताबादची ओळख होते.

सत्ययुगात हे नगर भद्रावती नगर या नावाने प्रसिद्ध होते. तेथे भद्रासेन नावाचा रामभक्त राजा होता. तो राजा प्रभू रामचंद्राचे भजन करीत असतांना रामभक्त हनुमान त्या ठिकाणी प्रकट झाले. श्री रामचंद्राचे भजन ऐकून हनुमान निद्रीस्त झाले. भजन संपल्यानंतर हनुमाने वर मागण्यास सांगितले. राजाने असा वर मागितला की आपण येथेच निवास करावा आणि आजन्म आपल्या भक्ताच्या मनोकामना पुर्ण कराव्या. हे ऐकुन हनुमान प्रसन्न झाने व तथास्तू म्हणून हनुमान गुप्त झाले. आज ही खुलताबाद येथे मारूतीची मुर्ती निद्रीस्त दिसत असली तरी निद्रीस्त नसुन गाढ निर्वीकल्प भाव समाधी अवस्थेत आहे.[7] भद्राचा अर्थ कल्याण असाही होतो. प्राचीन काळी हे मंदीर 200 × 150 फुट भव्य होते. सर्व काम चिरंबंदीत झाले होते. मोगल काळात औरंगजेबाच्या कारकीर्दीत या गावाचे नांव "खुलताबाद" ठेवण्यात आले.

खुल्द या शब्दाचा अर्थ 'स्वर्ग' असा होतो. औरंगजेबास हे स्थान स्वर्गाप्रमाणे दिव्य आणि अलौकिक वाटत असावे. म्हणुन त्याने या गावाचे नाव 'खुलताबाद' ठेवले. या मंदीरास लागुन भद्राकुंड आहे. या कुंडातील माती अंगास लावून स्नान केल्यास आजार दुर होतात. अशी भावीकांची श्रद्धा आहे.[8] आज ही दर शनीवारी व शनी अमावस्येच्या दिवशी मोठी यात्रा भरते.

**बालरूपी भद्रा मारूती** :—खुलताबादापासून 8 कि.मी. अंतरावर कसाबखेडा हे गांव आहे. या गावाचे पूर्वीचे नांव सज्जनपूर होते. नवसाला पावणाऱ्या या मारूतीचे बालरूप कसाबखेडा येथे आहे तर, तारूण्य अवस्थेतील रूप खुलताबाद येथे असुन वृद्धावस्थेतील रूप हे उत्तर प्रदेशातील अलहाबाद येथे आहे. अशा प्रकारची तिन रूपे आपणास बघावयास मिळतात[9]

**दत्त मंदीर सुलीभंजन** :— खुलताबादपासुन 5 कि. मी. सुलीभंजन पर्वत आहे. या पर्वतावर दत्त मंदीर आहे. काशी खंडात या पर्वताबद्दल माहिती मिळते. वेरूळ शिवालय महात्म्यात (संस्कृत 35 वा अध्याय) याचा निर्देश आहे? देवगिऱ्यातले दिशे सुर्यकुंड शिवालयं।/दत्तात्रय मनस्थानं तीर्थ त्रिगुण पावनं।।

या पर्वतालाच सुलिभंजन, सुर्यभंजन, सुलभभंजन अशा नावाने ओळखले जाते. मार्कंडेय ऋषीचे हे तपारण्य होय. त्यांच्या तपाने प्रसन्न होऊन महादेवाने त्यांच्या वरील मृत्यूचे संकट टळल्याची कथा सूर्यभंजन या ग्रंथात आहे. एकनाथ महाराजांनी गुरूच्या आज्ञेनुसार साधना केली म्हणुन हे ठिकाण नाथाचे साधना स्थान म्हणुन प्रसिद्ध आहे. येथील वैशिष्ट्ये म्हणजे संत एकनाथांनी ज्या ठिकाणी बसुन साधना केली त्या गोलाकार भव्यशिळेतुन वर हलकासा दगडाने आघात केल्यास घंटीप्रमाणे आवाज येतो. मात्र इतर शिळावर दगडाने आघात केल्यास आवाज येत नाही. दत्त मंदिराबरोबरच येथे सुर्यकुंड, चंद्रकुंड हे दोन कुंड एकनाथ मंदिर व कैवलेश्वर शिवमंदीर आहे.[10]

**श्री चक्रधर स्वामी – गदाना** :— आपल्या भारतास अध्यात्मीकाचा वारसा लाभलेला असुन तो सर्व जाती धर्मात पसरलेला आहे. मानवास आपल्या जिवनाचा उद्धार करून घ्यायचा असल्यास त्याला ईश्वराची भक्ती आवश्यक असते. गदाना येथे श्री चक्रधर स्वामीचे आगमन फुलंब्री मार्गे 1274 साली झाले. त्यांनी सोमनाथ मंदीरात चौकी आसन करून गावाच्या पश्चीमेस असलेल्या उंच टेकडीवर वन देवाच्या सानिध्यात मुक्काम केला. येथेच सध्या जागृत स्थान आहे.

स्वामीच्या येथील वास्तव्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांचे मनोरथ पूर्ण होतात, असा समज आहे. श्री चक्रधर स्वामीचे पवित्र चरणांकित स्थान असल्यामुळे आजारी व पीडीतांच्या वेदना दुर होतात व आपले जिवन सुखी होते अशी श्रद्धा आहे.[11] त्यामुळे अनेक आजारी भक्तगण आपला आजार बरा होण्यासाठी दर्शनास येतात.

**खुलताबाद परिसरातील सुफी संत** :— सुफी संताच्या आगमनापर्यंत दक्षिणेत इस्लाम धर्माचा प्रसार झालेला नव्हता. सुफी संत जेव्हा लोकांना मानवतेचा व समतेचा संदेश देऊ लागले तेव्हा राज्यकर्त्याकडून सुफी संतांना व त्यांच्या अनुयायांना त्रास होत असे. मात्र सामान्य लोकांच्या प्रेमामुळे व ईश्वरांच्या आशीर्वादाने स्थानिक राज्यकर्ते काहीही करू शकले नाही. पवित्र कुरानाप्रमाणे ते इतर धर्मग्रथांचाही आदर करीत असे.

सुफी संताच्या शिकवणीचा परिणाम जसा मुसलमान समाजावर झाला तसाच तो हिंदू समाजावरही झाला आणि हे दोन्ही समाज जवळ येण्यास फार मोठा हातभर लागला.[12] खुलताबादला आलेला पहिला सुफी म्हणजे हजरत शेख मुन्तजिबोद्दीन जर जरी बक्ष धर्मासाठी तो वाटेल तेवढे द्रव्य देत असे म्हणुन त्याला जर बक्ष म्हणजे द्रव्य दाता असे म्हणत हजरत शेख मुन्तजिबोद्दीन जर जरी बक्ष यांनी बंधुत्व आणि एकात्मतेचा संदेश दिला.

इ. स. 1310 मध्ये तो पैगंबरवासी झाले. खुलताबाद येथे दरवर्शी हजरत शेख मुन्तजिबोद्दीन जर जरी बक्ष यांचा मोठा उरूस भरतो. अनेक थोर सुफी संताच्या कबरी येथे आहे.[13] सुफी पंथाचे हिंदुस्थानात चार प्रमुख संप्रदाय परिमीत होते.

1) चिश्ती संप्रदाय
2) कादरी संप्रदाय
3) सुहरवर्दी संप्रदाय
4) नक्षबंदी संप्रदाय

**शहा जलालोद्दीन गंज–ए–रवां** :— हे सोहरवर्दी परंपरेचे सुफी होते. गुरूच्या आज्ञेनुसार ते दक्षिणेकडे आले असता. खाकसार मुक्कामी त्यांनी रोवलेल्या काठीला पालवी फुटली व त्यानंतर त्यांनी खुलताबादच्या परीसरात वास्तव्य करून इस्लाम धर्मप्रसार व प्रचार केला. त्यांनी लोकांना मानवता, समता यांची शिकवण दिली. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढत गेली. परियोका तलाब

शेजारी त्यांची दर्गा असून तेथील घुमटाच्या पाठीमागे व समोरचे झाड एकाच प्रकारचे आहे.

या झाडांचे फळ वांझ स्त्रीला खायला दिले तर तिला पुत्र प्राप्ती होते असा लोकांचा समज होता.[14]

**हजरज सय्यद युसूफ हुसैनी** :—ह. बुऱ्होद्दिनच्या सहवासात वाढलेले व तुघालकांच्या आदेशाने दिल्ली वासीया सोबत देवगीरीस आले. प्रसिद्ध सुफी सामान्य लोक यांना राजु कत्ताल या नावाने ओळखतात. त्यांना भजनांची विशेष आवड होती. यांची समाधी हजरत जर जरी बक्ष दर्ग्यामागे 200 मीटर अंतरावर आहे.[15]

**निष्कर्ष**:—1. खुलताबाद तालुका प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळातील धार्मिक दृष्टया महत्वाचे केंद्र आहे. हिंदु धर्माचे अराध्य दैवत, भद्रा मारोती निद्रीस्त अवस्थेतील मुर्तीमुळे देशभरातुन लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

2. जग प्रसिद्ध पर्यटन स्थळ खुलताबाद तालुक्यातील वेरूळ ची गणना होते. भारतातील 12 वे ज्योतीर्लींग श्री घृष्णेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची सदैव गर्दी असते. मध्ययुगील काळात खुलताबाद हे दक्षिण भारतात इस्लामाचा प्रसार, प्रचार करणाऱ्या सुफी संप्रदायाचे महत्वाचे केंद्र होते.

3. सुलीभंजन सुर्यकूंड व दत्त मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. एकनाथाचे साधना स्थान म्हणुन हे ठिकाण प्रसिद्ध आहे. खुलताबाद तालुक्यातील म्हैसमाळ हे धार्मीक व पर्यटनस्थळ म्हणनु प्रसिद्ध आहे. गिरजा देवी मंदीर व गिरीजा देवी महोत्सव (यात्रा) प्रसिद्ध आहे. समुद्रसपाटीपासुन 3300 फुट उंचावर असल्यामुळे हे थंड हवेचे ठिकाण म्हणुन सर्वत्र प्रसिद्ध आहे.

## संदर्भ ग्रंथ

1. Gazeteer of the Nizam's Dominions, Aurangabad Dis. (1884) page no. 829 2. Ibid, Page no. 830. 3. टोपरे विनायक बुवा—ब्रम्हसरोवर अर्थात श्री वेरूळ माहात्म.4. कित्ता —5. श्री. गा. ब. गा. हेरंबराज बाळ शास्त्री शर्मा केसकर, श्री लक्षविनायक महात्म. 6. चौधरी विजय—पर्यटनाचे तीर्थक्षेत्र, वेरूळ लेणी परिसर, अप्रतिम प्रकाशन, न्यू श्रेयनगर, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 54 7. डॉ. कठारे/डॉ. नगराळे— मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर नांदेड, प्रथम आवृती, नोव्हेंबर—1999 पृ. क्र. 401 8. कित्ता पृ. क्र. 401 9. कुलकर्णी लक्ष्मीकांत दै. सामना औरंगाबाद मधील लेख, दि. 01/04/2009 पृ. क्र. 5 10. चौधरी विजय —पर्यटनाचे तीर्थक्षेत्र, वेरूळ लेणी परिसर, अप्रतिम प्रकाशन, न्यू श्रेयनगर, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 62 11. कित्ता पृ. क्र. 67 12. कित्ता पृ. क्र. 35 13. कित्ता पृ. क्र. 36 14. डॉ. शेख एजाज— सुफी संप्रदाय (तत्वज्ञान : धार्मिक व सामाजिक) पृ. क्र. 33 15. कित्ता पृ. क्र. 208